# फिनोलेक्स अकॅडमी ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड टेक्नॉलॉजी रत्नागिरी.
## ईबीसी नोटीस

FAMT/ACCTS/ 448 /2016

19/12/2016

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शै.व. २०१६-१७ (पूर्वीचे नांव – ईबीसी) विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

**इंजिनीअरींग (UG) व एमसीए (PG) चे शै.व. २०१६-१७ मधील पात्र विद्यार्थी**

- **सदर योजना महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांसाठी असून ज्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये मधून प्रवेश घेतला आहे अशांसाठी आहे.**
- **महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये मधून प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांनी अधिवास प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य यांचे सादर करावे.**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये विविध वर्षात शिकत असलेले खुल्या प्रवर्गातील आर्थीक दृष्या मागास गटातील विद्यार्थी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शै.व. २०१६-१७ (पूर्वीचे नांव – EBC) व डॉ. पंजाबरात देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शै.व. २०१६-१७ या योजनेसाठी लागू असलेल्या अटी व नियमानुसार ऑनलाईल अर्ज भरण्यास पात्र आहेत. या योजनेचा ज्या विद्यार्थ्यांना लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी त्यांचे अर्ज ऑनलाईन भरणे आवश्यक असून नंतर सदर ऑनलाईन भरलेले अर्ज त्याला लागणाऱ्या इतर आवश्यक कागदपत्रांसह **दोन प्रतीत** ऑफीस मध्ये सादर करावेत.

ऑनलाईन अर्जासोबत आवश्यक असणारी इतर कागदपत्रे खालील प्रमाणे अर्ज ऑफीसमध्ये भरताना लावावीत.

**(अर्ज दोन प्रतीत सादर करावा – (अर्जाला स्टॅपलर पीन मारु नये))**

०१) ऑनलाईन भरलेला कलर प्रींट केलेला अर्ज. (यावर तुमचा व्हॉट्सअॅप चा नंबर व वडीलांचा नंबर लिहावा)

०२) उत्पन्नाचा **मुळ** दाखला सन २०१५-१६ चा. (सदर दाखला हा वडीलांचे नावे हवा व तो तहसीलदार यांनी निर्गमीत केलेला असावा.) (जर वडील हयात नसतील तर आईच्या नावे दाखला. आई व वडील दोघेही हयात नसतील तर ज्यांनी पालकत्व स्वीकारले आहे त्यांचा दाखला.) (जे हयात नाहीत त्यांचा मृत्युचा दाखला लावणे आवश्यक आहे – फोटोकॉपी)

०३) डोमीसाईल सर्टीफीकेट – फोटोकॉपी. (हे नसल्यास याला कोणताही पर्याय नाही)

०४) लिव्हींग सर्टीफीकेट – फोटोकॉपी. (१२ वी नंतर डीग्री इंजि. / डिप्लोमा नंतर डायरेक्ट सेकंड ईयर डिग्री इंजि. / गॅज्युएशन नंतर एमसीए असे असल्यास १२ वी चे / डिप्लोमा चे / गॅज्युएशन चे)

०५) मागील वर्षाच्या गुणपत्रीका – फोटोकॉपी. (दोन्ही सेमीस्टरचे) मार्क शीट पाहीजे, लेजर कॉपी चालणार नाही.

०६) रेशन कार्ड – फोटोकॉपी. रेशन कार्ड वरील वडीलांचे, आईचे व तुमचे नांव हायलाईटरने हायलाईट करावे.

०७) गॅप सर्टीफीकेट – मुळ प्रत सेतू मध्ये रजिस्टर केलेली. (ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये शिक्षणात खंड पडला आहे अशांसाठी आवश्यक)

०८) शै.व. २०१६-१७ मध्ये कॉलेजची फी भरल्याची रिसीट – फोटोकॉपी.

०९) आधार कार्ड – फोटोकॉपी. (जे विद्यार्थी नव्यानेच अर्ज भरत आहेत आणि ज्या जुन्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बॅंकेशी लिंक झालेले नाही (आपल्या अर्जावर या बाबत नोट येत आहे ती पहावी) अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे ज्या बॅंकेच्या शाखेमध्ये खाते आहे त्या खात्याशी आधार कार्ड लिंक केल्याचे पत्र बॅंककडून घेऊन येणे. पत्राचा फॉरमॅट ग्राहक भांडारात उपलब्ध आहे.)

१०) बॅंक पासबूक पहील्या पानाची फोटोकॉपी. (सदर खाते हे विद्यार्थ्याच्या नावाने बॅंक ऑफ इंडीयाचेच असावे. शाखा कोणतीही चालेल फक्त तेथे ऑनलाईन पध्दतीने रक्कम जमा करण्याची सोय हवी. तसेच सदर खाते हे जॉइंट / मायनॉर / कर्जाचे किंवा बंद स्थीतीतील असू नये.)

११) ५० % शिक्षण शुल्कापेक्षा उत्पन्न कमी असल्यास ज्यांच्याकडून अर्थसहाय्य घेतले त्यांचे मूळ प्रतिज्ञापत्र किंवा बॅंकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास बॅंकेचे प्रमाणपत्र. (उदा. विद्यार्थ्यांना शै.व. २०१६-१७ मध्ये लागू असलेल्या ट्युशन फी च्या निम्या रक्कमेपेक्षा जर त्याच्या पालकांचे उत्पन्न कमी असेल तर असे प्रतिज्ञापत्र किंवा बॅंकेचे कर्ज घेतले असल्यास बॅंकेचे लेटर द्यावे. उदा. टयुशन फी जर ६५०००/- असेल तर त्याच्या निम्मे ३२५००/- व या ३२५००/- पेक्षाही पालकांचे उत्पन्न कमी असेल तरच ११ वा मुद्दा विचारात घ्यावा.)

१२) स्वयं घोषणापत्र मुळ प्रत. (फॉरमॅट ग्राहक भांडारात उपल्ब्ध आहे.)
१३) प्रतिज्ञापत्र मुळ प्रत. (फॉरमॅट ग्राहक भांडारात उपल्ब्ध आहे.)
१४) **जे विद्यार्थी नव्याने पहील्यांदाच अर्ज भरत आहेत (जे डीप्लोमा करुन थेट व्दीतीय वर्षात किंवा प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला आहे) त्यांना त्यांच्या पूर्वीच्या कॉलेजमध्ये किती वर्ष ईबीसी सवलत मिळत होती याचे पूर्वीच्या कॉलेजचे पत्र. जर मिळत नसेल तरी सुध्दा त्या कॉलेजकडून तसे पत्र आवश्यक आहे. – मुळ प्रत.**
१५) कॅप राऊंड मधून प्रवेश घेतल्याचे पत्र.- फोटोकॉपी. (म्हणजे या कॉलेजमध्ये तूम्ही प्रवेश घेतल्यावर जी फायनल रीसीट-कम-अॅकनॉलेजमेंट मिळते ते पत्र. पत्राच्या वरती रीसीट-कम-अॅकनॉलेजमेंट असे लिहीलेले असते.)
१६) सेल्फ अटेस्टेशन डीक्लरेशन मुळ प्रत (फॉरमॅट ग्राहक भांडारात उपल्ब्ध आहे.) (सेल्फ अटेस्टेशन म्हणजे मुळ दाखले सोडून उरलेल्या कागदपत्रांवर विद्यार्थ्यांनी स्वता सही करुन खाली नाव टाकणे असे म्हणतात.)

सुचना – जे विद्यार्थी डॉ. पंजाबरात देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शै.व. २०१६-१७ साठी अर्ज करणार आहेत त्यांनी ऑनलाईन साईट वर जी कागद पत्रे मागीतली आहेत ती जोडावीत व ती वरील कागदपत्रांबरोबर जोडावीत.

विषेश सुचना

०१) एज्युकेशनल डिटेल्स भरताना ती अचूक भरावीत. विद्यार्थी जर पूर्ण पास असेल तर पॉइंटर व्यवस्थीत भरावा. जर एटीकेटी लागून पास असेल तर एटीकेटीचे विषय सोडावेत. यामध्ये ओरल,प्रॅक्टीकल,थीअरी हे सर्व सोडावे तसेच एटीकेटी विषयाचे आऊट ऑफ मार्क पण सोडावेत व फक्त पास झालेल्या विषयांचे जे मार्क मिळाले आहेत यामध्ये ओरल,प्रॅक्टीकल,थीअरी हे विचारात घ्यावे. नंतर पास झालेल्या विषयांचे आऊट ऑफ मार्कावरुन टक्केवारी काढावी. ही जी आलेली टक्केवारी असेल त्यानुसार तुमच्या मार्कशिट च्या मागे जे टेबल दिले आहे त्यावरुन पॉइंटर काढावा.
०२) महाराष्ट्र शासनाच्या नवीन निर्णयानुसार ईबीसी उत्पन्न मर्यादा ही खालील प्रमाणे आहे. जे नव्याने अर्ज भरणार आहेत त्यांच्यासाठी.

अ) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न (२०१५-१६ चे) २.५० लाखापेक्षा कमी आहे त्यांना शैक्षणिक टक्केवारीची अट नाही.

ब) परंतू ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न (२०१५-१६ चे) २.५० लाखापेक्षा जास्त पण ६ लाखापेक्षा कमी आहे त्यांना शैक्षणिक टक्केवारीची अट लागू असून त्यांनी ज्या कोर्स साठी प्रवेश घेतलेला आहे त्या कोर्स साठी लागणारी कमीतकमी जी शैक्षणिक अर्हता आहे त्यामध्ये त्यांना ६० किंवा ६० पेक्षा जास्त टक्केवारी आवश्यक आहे. उदा. १२ वी नंतर डीग्री इंजि. / डिप्लोमा नंतर डायरेक्ट सेकंड ईयर डिग्री इंजि. / गॅज्युएशन नंतर एमसीए असे असल्यास १२ वीत / डिप्लोमा फायनल ईयर / १२ वी यामध्ये ६० किंवा ६० पेक्षा जास्त टक्केवारी आवश्यक आहे.

यामध्ये जे जूने विद्यार्थी व्दीतीय/तृतीय/चतूर्थ वर्गात शिकत आहेत व जे या योजनेत नव्यानेच अर्ज भरत आहेत त्यांना वरील अ व ब मुद्दे लागू आहेत.
०३) जे विद्यार्थी या कॉलेजमध्ये शिकत आहेत व ज्यांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पर्यंत शिकत येई पर्यंत दोन वेळा पूर्ण नापास झाले आहेत (सलग दोन वेळा किंवा खंडाने तसेच २०१६-१७ चा लागणार निकाल हा सुध्दा पूर्ण नापास असेल तर तो निकाल सुध्दा विचारात घेऊन) त्यांना या योजनेचा लाभ कायमस्वरुपी या पुढे घेता येणार नाही.
०४) विद्यार्थ्यांची प्रत्येक सेमीस्टरची हजेरी ही **कमीत कमी ७५ टक्के** असलीच पाहीजे अन्यथा या योजनेचा लाभ मिळणार नाही.

विद्यार्थ्यांनी त्यांचे ऑनलाईन अर्ज ३०-१२-२०१६ पर्यंत dtemaharashtra.gov.in या साईट वर जाऊन पुढे डाव्या बाजूला असलेल्या **Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Fee Reimbursement Scheme (EBC)** New या सब मेनू मध्ये जाऊन भरावेत.

ऑफीसमध्ये हार्ड कॉपी दोन प्रतीत भरण्याची तारीख १९ ते ३० डिसेंबर २०१६ अशी आहे. यानंतर कोणत्याही परीस्थीतीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत कारण कॉलेजला हे सर्व अर्ज तपासून ३० डिसेंबर २०१६ पर्यंत ऑनलाईन रीजनल ऑफीस ला पाठवायचे आहेत. यास्तव कोणीही ३० डिसेंबर २०१६ नंतर अर्ज ऑफीसमध्ये आणू नयेत. तसेच शेवटच्या दिवसापर्यंत अर्ज भरण्याची वाट बघू नये. अर्ज लवकरात लवकर ऑनलाईन भरुन ऑफीसमध्ये त्वरीत सादर करावा.

Dr. Kaushal Prasad
PRINCIPAL
FINOLEX ACADEMY OF MANAGEMENT & TECHNOLOGY
RATNAGIRI 415 639